''संकटांनी, अडचणींनी, बिकट प्रसंगांनी डगमगून न जाता साक्षीवत राहून व निर्भयतेने बाबांवर पूर्ण भरवसा ठेवावा. अमुक सोडावे, अमुक ग्रहण करावे या अहंप्रेरित वृत्तीला दाबून जे घडेल त्याला साक्षीभावाने पाहात रहावे.'' हा उपदेश तर्खडांचे निमित्ताने आपणा सर्वांसच केलेला आहे असे मला वाटते.

असेच बाबांचे काही बोल व त्यावरील अनुभुतीकथन आपल्यापुढे सादर करीत आहोत.

**बाबांची वैखरी।**
**बाबा असतां देहधारी।**
**परीं पुढेही देहत्यागानंतरी।**
**स्वयें निर्धारी निजमहिमा ॥१०४॥** अ. २५

आपल्या श्रद्धान्वित भक्तीस बाबा कसे नित्यांकित झाले ह्याचा अनुभव कथन करीत आहे. **सौ. सुनीता विचारे**.

**साई बोल :**

**''जेथे भक्ति श्रद्धान्वित।**
**तयांचा मी नित्यांकित।**
**ये अर्थी न व्हावे शंकित।**
**इतरत्र अप्राप्य मी ॥८३॥** अ. २

साईसचरित लिहीण्यास अनुज्ञा देतेवेळी साईबाबांनी हेमाडपंतांना उद्देशून हे बोल म्हटलेत.

**अनुभव :** माझ्या यजमानांना ध्यानधारणेसाठी साईबाबांची बसलेल्या स्थितीतील छबी हवी होती. मी एकदा वांद्र्याला श्री साईसच्चरित लेखक हेमाडपंत ह्यांच्या निवासस्थानी गेले होते. तिथे समोरच माझ्या मिस्टरांना हवी असलेली तसबीर होती. नकळत माझ्या तोंडून निघून गेलं. ''अग आई (अक्काई) ह्यांना अशीत तसबीर हवी आहे बघ.'' सौ. मीना वहिनींनी (हेमाडपंतांची नातसून) ते ऐकले. त्या म्हणाल्या, ''अगं हीच ने ना?'' त्या दिवशी मला परस्पर साखरपुड्याला जायचे होते म्हणून मी तसबीर अक्काईला घरी (डोंबिवलीला) घेऊन येण्यास सांगितले.

ज्या दिवशी आईतसबीर घेऊन येणार होती, त्याच दिवशी माझ्या सासरी पूजा होती. मला पूजेला जाणं जरूरीचे होते. तसेच तसबीर घेऊन आई आल्यावर मी घरी असणे पण मला महत्त्वाचे वाटत होते. माझे साईबाबा घरात येणार मग मी स्वागत, नैवेद्य करायला घरात हवी असं मला मनापासून वाटत होतं.

काय करावं समजत नव्हतं. मी मनोमन बाबांची प्रार्थना केली. बाबा मला दोन्ही गोष्टी साध्य होऊ द्या अशी आळवणी केली. आणि काय सांगू तुम्हाला रेल्वेच्या काही गोंधळामुळें आई दोन दिवस उशीरा आली. माझी सासरची पूजा मला तीर्थप्रसादासह मिळालीच. शिवाय बाबांसाठी स्वागत आणि प्रसाद करण्यासही मला वेळ मिळाला. इतकंच नाहीतर साईबाबा माझ्याकडे आलेत ह्याची जणू साक्ष पटवण्यासाठी आरती चालू असतानाच अचानक एक सवाष्ण आली. मी तिची ओटी भरून तिलाही गोड खाण्यास दिले. प्रसाद दिला. आम्हां सर्वांना खूप आनंद झाला.

आहे की नाहीं,

**फकीर येथींचा मोठा दयाळू।**
**करिल व्यथेंचे निर्मळु।**
**प्रेमे करील प्रतिपाळु।**
**तो कनवाळुं सकळांचा ॥७४॥** अ. १३

आपण सर्वांनी साईभगिनी सुनीताचा तिला आलेला अनुभव ऐकलात. तशी ती नातेवाईकांची सरबराई करण्यात अडकलेली असते. अशा ह्या सांसारिक कर्तव्यात अडकलेल्या सुनीताशी वेळ ठरवूनच बाबांना यावं लागलं पहा.

श्री साईसचरितलेखक हेमाडपंत ह्यांनासुद्धा बाबांनी स्वप्नात येऊन सांगितले मी होळीच्या दिवशी येत आहे म्हणून. हेमाडपंतांनी बाबांच्या स्वागताची भोजनाची तयारी केली. काय आश्चर्य पहा! बरोबर जेवणाच्या वेळीच बाबा तसबीरीच्यारूपात आले. ती तसबीर अजूनही त्यांच्या राहत्या घरात दर्शनास आहे.

श्री साईसचरितात ३३व्या अध्यायात उल्लेख आहे ना -

**निर्मळ आरसा निर्मळ उदक।**
**तै बिंबाचे प्रतिबिंब देख।**
**छबी हेही प्रतिबिंब एक।**
**शुद्ध प्रतिक बिंबाचे ॥१६१॥**
**म्हणून संताच्या छबीचें दर्शन।**
**आहे प्रत्यक्ष दर्शनासमान।**
**सर्वदर्शी संतांची जाण।**
**तीच ही शिकवण सर्वांते ॥१६२॥**

पहा बरं इथे संतांच्या छबीचे दर्शन प्रत्यक्ष दर्शनासमान म्हटले आहे. अशा ह्या सर्वदर्शी साईबाबांच्या मूर्तीच्या दर्शनाने आणि बाबांचे भजन सतत केल्याने आपले दु:ख कसे निवारण झाले हे साईबोलांचेच उदाहरण देऊन सांगत आहेत साईभगिनी **सौ. नीलाताई कुलकर्णी.**

**साई बोल :**

**मग जों गाई वाडें कोडे।**
**माझें चरित्र माझे पवाडे।**
**तयाचिया मी मागें पुढें।**
**चोहींकडे उभाचि ॥१२॥**

श्री साईसचरितातील ३ऱ्या अध्यायात साईचरित्र लिहीण्याची हेमाडपंत यांना अनुज्ञा देताना मन:पूर्वक साईरूपी पूर्णब्रह्मास

आळविले असता बाबा भक्ताच्या पाठीशी सदैव कसे उभे असतात हे बाबांनी सांगितले आहे.

**अनुभव :** माझी मुलगी तापाने हैराण झाली होती. ताप उतरत नव्हता. आम्ही सर्वजण सतत बाबांची भजनं म्हणत होतो. बाबांच्या मंदिरी नेल्यास आराम पडेल म्हणून आम्ही तिला साईमंदिरात नेण्याचे ठरविले. तापाच्या ग्लानीमुळे तिला चार पावलेही चालवत नव्हते. तिला धरूनच रिक्षातून देवळात नेली. देवळात तिला साईदर्शन व उदीप्रसाद दिला. थोडावेळ बाबांच्या मूर्तीसमोर ती बसून राहीली. थोड्याच वेळात तिला हुशारी वाटली. तिचा अशक्तपणा कमी झाला. ती आपणहून रिक्षात बसली. काही दिवसातच तिचा ताप निघून गेला. आणि ती पूर्ण बरी झाली.

* * *

मध्यंतरी तापाने डोंबिवलीवासी अतिशय घाबरून गेले होते. आपल्यावर ह्याचे वारे नको म्हणून प्रत्येकजण काळजी घेत होता. असा हा डोंबिवली ताप आमच्या नीलाताईंच्या घरात अनाहुत पाहुण्यासारखा शिरला. आधारस्वरूप साईंचा त्यांनी भजन म्हणत धावा सुरू केला. तापानी बेजार असलेल्या मुलीस बाबांच्या देवळात नेले तर बरे वाटेल असे वाटून त्यांनी मुलीस साईंच्या मंदिरी नेले. उदीप्रसाद घेण्यास लावले. आणि खरंच तिला खूप बरं वाटू लागलं. लवकरच ती बरी झाली.

औषधांची माहीती असलेले बाबांचे लाडके भक्त माधवराव देशपांडे. ह्यांच्या वहिनी ग्रंथीज्वराच्या तापाने आजारी असता त्यांचे भाऊ बाप्पाजी त्यांना नेण्यास आले व माधवरावांनी बाबांच्या कानावर घातले. बाबा म्हणाले उदीप्रसाद पाठवून दे. काळजी करू नकोस. तू उद्या सकाळी जा. परंतु त्यांनी बाबांची आज्ञा मानली तरीही त्यांना सारखी वहिनीची काळजी वाटत होती. उजाडताच बाबांची आज्ञा घेऊन ते वहिनीस पहावयास गेले. पहातात तो काय तडकाफडकी माणसांचा निर्णय लागणाऱ्या ग्रंथीज्वराच्या तापाने बेजार झालेली वहिनी चुलीवर चहा ठेवत होती. बाप्पाजी म्हणाले काल रात्री लावलेल्या उदीमुळे तिला घाम येऊन ताप नाहीसा झाला. आता बरी आहे. आहे की नाही बाबांच्या बोलाची व उदीप्रसादाची प्रचीती ? बाबांनी म्हटलेच आहे ना :

**''मी ना देव ना ईश्वर।**
**मी ना 'अनल हक्क' ना परमेश्वर।**
**'याद हक्क' मी यादगार।**
**बंदा मी लाचार अल्लाचा ॥१३०॥**
**सांडूनिया अहंकार।**
**मानूनि तयाचे आभार।**
**तयावरी जो घालील भार।**
**बेडा तो पार होईल'' ॥१३१॥**

साईंचीच भजनं गात साईश्वरावर घालूनी भार मुलीच्या तापास बाबांनी पार पळवून लावले हे आताच आपण अनुभवातून ऐकलेत.

आता मधूनच हमखास खंडीत होणाऱ्या लोकलचे वेळापत्रक सांभाळून घर व नोकरी ह्यांची वेळ साधणारे. त्यातूनच साईकथांची श्रवणभक्ति केल्यामुळें स्वत:च्या पत्नीबद्दल आलेला अनुभव साईवचनाद्वारे आपल्याला सांगत आहेत **श्री. रवि पाटील.**

**साई बोल :**

**कृतांताच्या दाढेतून।**
**काढीन मी निजभक्ता ओढून।**
**करितां केवळ मत्कथा श्रवण।**
**रोगनिरसन होईल ॥१७॥** अ. ३

तिसऱ्या अध्यायातील सदर ओवी श्रवणभक्ती केल्याने काय फायदे होतात. ह्याचे वर्णन करताना बाबांनी भक्तांना वरील बोलाद्वारे आश्वासन दिले आहे.

**अनुभव :** माझी पत्नी असह्य अशा आजाराने त्रासली होती. डॉक्टरांचे निदान काहीच झाले नाही असे दाखवत होते. तिला मानेशी एक गाठ होती. ती टाटामध्ये टेस्ट केली. गाठ साधीच पण शस्त्रक्रिया करून काढणे आवश्यक. परंतु काय झाले न कळे उदी प्राशन, पोथी वाचणे चालूच होते. शस्त्रक्रिया करण्याचा दिवस येण्याआधीच पत्नीस जोरात उलटी झाली. पुनश्च टेस्ट झाल्या पण गांठ काही सापडली नाही. जणू काही बाबांच्या उदीप्राशनाने ती विरघळून उलटीद्वारे निघून गेली पहा.

**तुम्ही जाणा तुमची करणी।**
**मज तो अहर्निश तुमची घोकणी।**
**ऐशीं बाबांची प्रेमळ वाणी।**
**असेल स्मरणीं बहुतांच्या ॥९३॥**
**नलगे आम्हां ज्ञानकथा।**
**पुरे ही एक साईंची गाथा।**
**किती ही पापे असोत माथां।**
**संकटी त्राताहा आम्हां ॥९४॥** अ. ३७

आताच आपण पाटील ह्यांचा अनुभव ऐकलात. अहो कलियुगात चक्रव्यूहातून बाहेर पडणे सोपे आहे. पण डॉक्टरांचे चक्र जर का एखाद्याच्या मागे लागला. तर त्यातून तो धनुर्धारी अर्जुनच काय पण एखादा नामांकित धन्वंतरी डॉक्टरही ह्या

चक्रातून बाहेर पडणे शक्य नाही.

सद्गुरू साईनाथांनी जिथे महाकाळ यमासही मागे परतवले आहे. तिथे ह्या चक्रव्यूहाची काय गती ?

श्री साईसच्चरितात आळंदीच्या एका स्वामींस कानाच्या दुखण्याचा त्रास होता. शस्त्रक्रियेने काहीही आराम पडला नाही. शेवटी कंटाळून ते साईआषिश घेण्यास बाबांकडे आले. बाबांनी स्वहस्ते उदीप्रसाद देऊन. सर्व ठीक होईल. असा कृपाशिर्वाद दिला. आठ दिवसातच कानाचा ठणका थांबून; सूजही निघून गेली. डॉक्टरांचा सल्ला घ्यावा म्हणून ते मुंबईला आले. तेथे डॉक्टरांनी ऑपरेशनची गरज नाही असे सांगितले. डॉक्टरसुद्धा अचंबीत झाले. सद्गुरूसारखा पाठीराखा असता का करशी जीवा चिंता ? असेच म्हणावेसे वाटते नाही ?

कोणाचा कितीही निश्चय प्रबळ।
न चले चळवळ बाबांपुढे।
नाहीं तयाच्या हें आधीन।
पराधीन तो सर्वस्वी ॥२५॥
ऐसें मी मी म्हणता।
थकले कित्येक निश्चय करितां।
साई एक स्वतंत्र देवता।
गळे अहंता इतरांची ॥२६॥ अ. १२

आहेच साई एक स्वतंत्र देवता. म्हणूनच अजूनही भक्तांच्या मागे उभी आहे. इतकंच नाही तर देहधारी असतांना हेमाडपंतांना दिलेले कृपाषिश आजतागायत त्यांच्या घरात वरदहस्ताने अनुभवणारी साईभगिनी **सौ. भावनाताई जेऊरकर** त्या बोलांबद्दल सांगत आहे.

**साई बोल :**

**ताटे याची भरली सदा।**
**यावज्जीव न रितीं कदा।**
**भावे मत्पर होतां सर्वदा।**
**हरतील आपदा तयाच्या ॥७७॥**

श्री साईसच्चरितातील ३ऱ्या अध्यायातील हे बोल बाबा हेमाडपंतांना उद्देशून म्हणताहेत. हेमाडपंतांच्या वाढत्या संसारासाठी त्यांना दुसरी नोकरी मिळावी म्हणून श्री अण्णा चिंचणीकर बाबांना विनंती करत होते.

**अनुभव :** हेमाडपंत सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यावर त्यांना मिळणारी पेन्शन अपुरीवाटली. दुसरी नोकरी करावी अशी त्यांची इच्छा होती. बाबांच्या कृपेने त्यांना दुसरी नोकरी ६ महिन्याकरिताच मिळाली. परंतु नंतर ते श्री साईसच्चरित लिहीण्याच्या निमित्ताने बाबांच्या सेवेत रमले तसतसे त्यांच्या घरातील अडचणी दूर झाल्या. आजतागायत त्यांच्या घरात काही कमी पडले नाही; पडत नाही; तसे पडणारही नाही. हे आपण सर्व वांद्र्याच्या दाभोळकरनिवासी उत्सवाच्या निमित्ताने पहातच आहोत.

**आज तेथें जें भजनपूजन।**
**कथाकीर्तन पुराण श्रवण।**
**अतीथी अभ्यागतां अन्नदान।**
**होते, त्या कारण श्री साई ॥३९॥**
**आज तेथें जें अन्नसंतर्पण।**
**लघुरुद्र-महारुद्रावर्तन।**
**देशोदेशींचे येती जन।**
**त्या सर्वांकारण श्री साई ॥४०॥** अध्याय ४४

बाबांचे बोलच आहेत ना "माझ्या भक्तांच्या घरी नाही अन्नवस्त्रांस कमी."

वाढत्या संसाराचा खर्च चालविण्यासाठी हवी असणारी नोकरी तर बाबांच्या आषिशाने मिळाली. पण फक्त सहा महिन्यासाठी. खरं तर बाबांना हेमाडपंतांना आपल्या सेवेतच घ्यावयाचे होते. त्याप्रमाणे हेमाडपंत पोथी लिहीण्याच्यानिमित्ताने वारंवार शिरडीत जाऊ लागले. बाबांची सेवा. बाबांचा सहवास मिळू लागला. संसाराचा खर्च चालविण्याकरिता पेन्शन व्यतिरिक्त नोकरीची गरज लागली नाही. म्हणतातच ना -

**बाबांसारिखा असतां वदान्य।**
**कां पां दैन्य आदरावें ॥२१॥** अ. ३

ह्याची प्रचिती दाभोळकरांच्या घरी आपणांस सर्वांना पाहावयास मिळते.

श्री साईसच्चरिताच्या १०व्या अध्यायात आहे ना -

**साई आत्मबोधाची खाण।**
**साई आनंदविग्रह पूर्ण।**
**धरा कास तयाची तूर्ण।**
**भवार्ण व संपूर्ण तराया ॥३४॥**
**खरेंच जे अपार अनंत।**
**भरलें आब्रह्मस्तंबपर्यंत।**
**ऐसें जें निरंतर अभिन्न अत्यंत।**
**मूर्तिमंत तें बाबा ॥३५॥**

क्रमशः



# शिरडीचे श्री साई

- चंद्रकान्त गरगटे
सातारा.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या मायभूमीत अनेक संत महात्मे होऊन गेले. या संतांनी आपल्या मधुर वाणीच्या द्वारे लोकांना उपदेश करून हितकारक व प्रेरणात्मक बोधामृत दिले.

भारत देशामध्ये समता, एकता व शांतता नांदावी म्हणून नगर जिल्ह्यातील कोपरगांव तालुक्यातील शिरडी या गांवी श्री साईबाबा हे बालवयामध्ये निंबतरूखाली प्रकट झाले. त्यावेळी त्यांचे कोवळे, गोंडस रूप पाहून आणि एवढ्या लहानशा वयामध्ये एवढी घोर तपश्चर्या पाहून नगरीतील सर्व लोक आश्चर्य करू लागले. या कलियुगामध्ये श्री बाबांचा अवतार म्हणजे या जगास मिळालेले वरदान आहे.

त्यानंतर हे लहान बालक कुठे दिसेनासे झाले. चांद पाटलाच्या पत्नीच्या भाच्याच्या लग्नाच्या निमित्ताने पुन्हा ते बालक वयाच्या सोळाव्या वर्षी शिरडी नगरामध्ये आले.

श्री साईबाबा हे शिरडीत आले त्यावेळी त्यांची भेट श्री खंडोबा मंदिराचे पुजारी म्हाळसापती यांच्याबरोबर झाली. म्हाळसापतींनी ''आवो साईबाबा'' अशी हांक मारली आणि तेच 'साईबाबा' नांव त्यांनी अखेरपर्यंत धारण केले. म्हाळसापती यांचे नंतर काशिराम शिंपी, शामा उर्फ माधवराव देशपांडे, तात्या कोते, काकासाहेब दिक्षीत, बायजाबाई, राधाकृष्णा आई, लक्ष्मीबाई शिंदे, उपासनी महाराज, बापूसाहेब जोग, बापूसाहेब बुट्टी इ. सारखे अनेक भक्तरत्न त्यांना लाभले. बाबांनी आपल्या सहवासामध्ये असलेल्या सर्वच भक्तांचा उद्धार केला.

हळुहळु श्री साईबाबांची किर्ती, सुगंधीत वायूलहरीप्रमाणे पसरू लागली. आजदेखील अनेक भक्तजनांना याची प्रचिती येते कोणास बाबा दृष्टांतरूपाने भेटले तर कोणास व्यक्तीच्या स्वरूपात भेटले. प्रत्येकास त्याच्या त्याच्या भक्तीप्रमाणे बाबांनी भेट देऊन त्याचे दु:ख नाहीसे करून त्याला सुख-समृद्धीचा मार्ग दाखवून दिला.

श्री साईबाबांची मुख्य शिकवण म्हणजे श्रद्धा आणि सबुरी. श्रद्धा म्हणजे विश्वास, भक्ती आणि सबुरी म्हणजे धीर, शांती. श्री साईबाबांचा हाच गुरूमंत्र आहे.

श्री साईबाबा हे शिरडीत आले तेंव्हा त्यांच्याजवळ एक वीट होती. बाबा त्या विटेची अतिशय काळजी घेत असत. बाबा या विटेला टेकून प्रहरचे प्रहर मशिदीत घालवित असत. रात्री झोपताना ती वीट बाबा उशाला घेत असत. बाबांचे त्याविटेवर अतिशय प्रेम होते. एक दिवस एक मुलगा मशिद झाडत असताना स्वच्छता करून नंतर त्या जागेवर ठेवावी या उद्देशाने त्याने ती उचलली होती. परंतु त्याच्या हातातून निसटून ती खाली पडली व तिचे दोन तुकडे झाले. वीट फुटल्याचे बाबांना समजताच त्यांना अतिशय वाईट वाटले. ते मनामध्ये कळवळले आणि दु:खी झाले. 'मी आता राहणार नाही.' त्यानंतर बाबांनी एका आठवड्यातच म्हणजे मंगळवार दिनांक १५ ऑक्टोबर १९१८ ''विजयादशमी'' रोजी दुपारी २ वाजून ३५ मिनिटांनी आपले अवतारकार्य संपविले व ते समाधिस्थ झाले.

श्री साईबाबा समाधिस्थ होण्यापूर्वी म्हणजे त्यांचा अंत:काळ येण्याअगोदर ते थोडे आजारीच होते. बाबांनी त्यावेळी जाणलेले होते की, आपला अंत:काळ जवळ आलेला आहे. यानिमित्ताने बाबांनी शेवटच्या तीन दिवसात वझे नांवाच्या भक्तास **''रामविजय''** हा ग्रंथ वाचण्यास सांगितले. बाबांनी या कालावधीमध्ये अनेक भक्तांना उपदेश केले. लक्ष्मीबाई शिंदे यांना बाबांनी ९ रुपये दक्षिणा दिली व त्यांना संतुष्ट केले.

बाबांचा अंत अगदी निकट येऊन पोहोचलेला होता त्यावेळी बयाजी आप्पा कोते या भक्ताच्या मांडीवर बाबांनी डोके टेकले आणि अखेरचा श्वास सोडला. त्यावेळी सर्व भक्तगण हे दृष्य पाहून हंबरडा फोडू लागले. कारण प्रत्यक्ष आपला परमेश्वर, कर्ता-करविता आपणांस सोडून गेला, अनाथांचा नाथ गेला, दीनांची माऊली सर्वांना सोडून गेली. सर्वत्र दु:खाची छाया पसरली होती. वृक्षवेलींची पर्णफुले दु:खाने कोमेजली होती. आणि आपली हालचाल बंद करून आपली घडण करणाऱ्या परमेश्वराने (साक्षात् श्री साईबाबांनी) मिटलेले डोळे पुन्हा

उघडावेत आणि सर्व जनांना आनंदीत करावे व आपण स्वत: त्यांच्या चरणकमलांची धूळ बनून जीवन सार्थकी लागावे अशी याचना करीत होते. सर्वच वातावरण दु:खी होऊन गेले होते.

शिरडी गांवातील स्त्री-पुरुष, लहान मुले सर्वजण दु:खी झाली होती. सर्वत्र दु:खाचा डोंगर पसरलेला होता. अश्रुंच्या प्रचंड सागरामध्ये सर्वजण बुडालेले होते. प्रत्येक भक्ताच्या मुखामध्ये एकच करूण शब्द होता. बाबा ! तुम्हीं आम्हांस असे सोडून एकटेच कां निघून गेलात. आम्हांस निराधार करून सोडून कां गेलात ? तुम्हांविना आम्हांला आता कोण त्राता आहे. हा करुणामय प्रसंग पाहून सर्वांचे कंठ दाटून आले. सर्व भक्त श्री साईबाबांच्या अंत्यदर्शनाकरिता द्वारकामाईमध्ये गर्दी करू लागले.

श्री साईबाबांनी १९१८ साली देह ठेवल्यानंतर त्या देहाचे काय करावयाचे या विचाराने सर्वजण चिंताक्रांत झाले. हिंदुचे म्हणणे होते की, हिंदु संस्काराप्रमाणे बाबांना बुट्टींच्या वाड्यात ठेवू तर मुस्लिमांच्या मते त्यांना कबरस्तानात नेऊ. या दोन्हीही गटामध्ये झगडा सुरू झाला. गांवच्या पाटलांनी एकच सांगितले की, बाबांना इतरत्र बाहेर कोठेही ठेवल्याचे आम्हांला आवडणार नाही. बाबांचा देह ठेवला तर वाड्यातच ठेवू. यावर पुन्हां विचारविनिमय होऊन सर्वांची मते घेतली. त्यामध्ये हिंदुच्या बाजुंनी भरपूर मते पडली आणि बाबांचा देह बुट्टी वाड्यातच ठेवण्याचा निश्चय करण्यात आला. त्यानंतर दोन्ही गटातील मतभेद मिटले गेले. बुट्टी वाडा हा श्री मुरलीधराची मूर्ती स्थापन करण्याकरिता बांधलेला होता. परंतु बाबांनी आपला अवतार संपविण्याअगोदर सांगितलेले वाक्य सर्वांच्या लक्षात होते. बाबांनी आजारी असतानाच सांगितलेले होते की, ''मला आता बरे वाटत नाही, तर मला बुट्टींच्या दगडी वाड्यात घेऊन चला.'' त्याप्रमाणे बाबांचा देह बुट्टींच्या वाड्यात आणला गेला.

बाबांचा देह सजविण्यात आला. त्यांना बसलेल्या अवस्थेत ठेवण्यात आले. त्या देहाची पुजा-आरती नित्याप्रमाणे केली गेली. ही आरती लक्ष्मणमामांनी केली होती. ही आरती करण्याकरिता मुस्लिम भक्तांनी थोडा विरोधदेखील केला. परंतु लक्ष्मणमामांना बाबांनी दसऱ्याला जो दृष्टांत दिला होता तो त्यांनी लोकांना कथन केला, ''तू माझी पुजा व आरती कर.''

त्यानंतर सर्वांच्या मते, श्री साईबाबांची पुजा-आरती लक्ष्मणमामांनी केली. मुस्लिम भक्तांनी आपले विचार बाजूला ठेवून ते हिंदु भक्तांच्या विचारामध्ये समरस झाले व सहकार्य करण्याकरिता पुढे आले.

परंतु या वाद-विवादामध्ये बाबांचा देह छत्तीस तास म्हणजे दीड दिवस तसाच राहीला होता.

दि. १६ ऑक्टोबर, १९१८ बुधवारी बाबांचा देह मशिदीतून हलविला. हिंदुशास्त्राप्रमाणे सर्व संस्कार केले जात होते. बाबांना स्नान घातले. त्यांची पुजा केली गेली.

त्यानंतर सर्व भक्तांनी अंत्यदर्शन घेतले व तो देह बुट्टींच्या दगडी वाड्यात आणला गेला. जी ठरलेली जागा होती त्यामध्ये तो देह ठेवला गेला. त्याच्यावर शास्त्रोक्त संस्कार केल्यानंतर तो देह समाधिस्थ केला गेला.

श्री साईबाबा समाधिस्थ होऊन आज ७८ वर्षे पूर्ण होत आहेत. शिरडी येथे नाना धर्माचे, नाना जातीचे लोक श्रद्धेने दर्शनाकरिता येतात. बाबांच्या महासमाधीचे दर्शन घेतात. बाबांचा आशिर्वाद घेऊन परत जातात. आणि येतांना बाबांच्या वचनाची प्रचिती घेऊनच माघारी येतात.

सद्गुरू श्री साईबाबांच्या महासमाधीला माझे कोटी कोटी प्रणाम !

## साई–आराधना

*साई तुझे नांव मानवा आधार*
*संकटी अडलो, सांभाळ संसार*

*दु:खी कष्टी माझी तळमळे काया*
*तुझी दयाघना, असो कृपाछाया*
*बुडत्यानांवेला साई तुझा आधार !*

*डगमगे नाव संकट सागरी*
*तारुनीया न्यावी, आता पैलतिरी*
*हे साईनाथा, तुची तारणार !*

*सोडवी सर्वस्वी; आलो साईचरणी*
*तुझेवीण आता, दुजा नाही कोणी*
*भाकीतो करूणा, तुझा हा पामर !*

**❑ एक. के. गुम्मलवार**
नांदेड.

# एक आवडलेला सत्पुरुष :
# जगन्माता श्री साई

- शाम जुवळे, मुंबई.



— ❖ ❖ ❖ —

*मला आवडलेले-भावलेले संत-सत्पुरुष या विषयावर लेख लिहितांना अनेक लेखकांनी 'श्री साईबाबां'चीच आवड लिहून पाठविलेली आहे. वाचकांना हे 'श्री साईबाबा'पर सर्व लेख एकत्र वाचावयास मिळावेत म्हणून आम्ही एकापाठोपाठ एक अशा क्रमाने सर्व लेख प्रसिद्ध करीत आहोत. श्री साईबाबा हे एकच पण त्यांच्याकडे पाहण्याचा प्रत्येक लेखकाचा दृष्टिकोन वेगवेगळा आहे. कदाचित त्यापैकी एक दृष्टिकोन आपलाही असू शकतो.*

— ❖ ❖ ❖ —

विश्व अफाट आहे; काळ अमर्याद आहे. अशा या वास्तवतेत वैयक्तिक जीवनाचा मेळ घालणे दुरापास्त आहे. परंतु असा मेळ घालण्यात वेळ मुळीच न दवडता जीवनाचा खेळ उत्तम प्रकारे खेळनू तंबुत यशस्वीरीत्या परतावे हेच श्रेयस्कर होय. खेळ जरी झाला तरी खेळ कशा तऱ्हेने कौशल्यपूर्ण खेळून यश मिळविता येते याचे प्रशिक्षण प्रत्येकाला घेणे आवश्यक असते. मार्गदर्शनाविना जीवनात वाटचाल करणे कठीण आणि त्रासदायक ठरते. जीवनात मार्गदर्शक हा असावाच लागतो.

**लाडक्या बालकासाठी माता धरिते हाती पाटी ।**
**तीच मग देई दिठी बालकालागी ॥**

कोणत्या कुळात जन्म घ्यावा हे कोणाच्याही हाती नाही. परंतु जन्म प्राप्त झाल्यानंतर तो सत्कारणी लागेल असा मनस्वी प्रयत्न करणे प्रत्येकाचे हाती आहे, यात दुमत असण्याचे कारण नाही.

प्रत्येक बालकासाठी त्याची माता हीच प्रथम दर्जाची शिक्षिका होय. बालकावरील तिचे निव्यार्ज प्रेम हा बालकाचा परमेश्वर असतो आणि तोच बालकाचे यथासांग संगोपन करीत असतो. अशा प्रेमामध्ये परमेश्वर होण्याची कल्पनातीत शक्ती असते, हे यावरून स्पष्ट होते. म्हणून ''मातृदेवो भव'' याची शिकवण सर्वप्रथम दिली जाते. मातृ-वंदनेला अतिशय महत्वाचे स्थान देण्यात येते याचे हे कारण होय. मातेसारखे प्रेमळ दैवत जगात दुसरे नाही. म्हणून प्रभू रामचंद्राने वनवासास निघताना जसा

स्वत:च्या आईचा निरोप घेतला तसाच भरताच्या आईचा मनात दुष्ट बुद्धीला मुळीच थारा न देता शुद्ध व पवित्र मनाने (देवी कैकेयीचाही) व प्रेमाने निरोप घेतला. हेच लाभेविनाचे विशुद्ध प्रेम होय. प्रेमाला बंधन वा मर्यादा नसते.

प्रभू रामचंद्राचे हे विलोभनीय प्रेम कलियुगामध्ये श्री साईबाबा या नावाने श्रीक्षेत्र शिरडी येथे पुन्हा एकदा भक्तांसाठी साकार झाले आहे, यात, भक्तिभावाने शब्द लिहिणाऱ्या या जीवाला तिळमात्र शंकावाटत नाही. विशुद्ध प्रेमच असा दिव्य-चमत्कार दाखवू शकते. श्री साईबाबा यांचा जन्म प्रारब्धानुसार झालेला नसून जगावरील त्यांच्या विशुद्ध प्रेमाद्वारे झालेला आहे. विशुद्ध प्रेम म्हणजेच परमेश्वर होय. श्री साईबाबांची जीवन-कहाणी म्हणजे विशुद्ध प्रेमाची दिव्य-कथाच होय.

श्री साईबाबांची दिव्य शिकवण म्हणजे भगवान श्रीकृष्णाने सांगितलेल्या भगवद्‌गीतेचे सार होय. प्रभू श्रीरामचंद्राप्रमाणे सत्य आणि धर्म यांचे पालन व श्रीकृष्णाप्रमाणे निर्मोह व निर्भयता यांचे आचरण, या दोहोंचे मंगल-दर्शन म्हणजे श्री साईबाबा होत. हेच मंगल दर्शन आता श्रीक्षेत्र शिरडी येथे प्रस्थापित झालेले आहे. या कारणास्तव शिरडी येथील मशिद द्वारकामाई बनली आहे आणि श्रीराम हे श्री साईराम झाले आहेत.

प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या जीवनाचे ध्येय ठरवून जीवनाचे नियोजन त्याप्रमाणे करावे लागते. मानवी जीवनाला प्रमुखत्वे दोन पैलू असतात. पारमार्थिक आणि संसारीक असे हे दोन पैलू होत. जग हे नित्य बदलत असल्यामुळे संसारीक ध्येयाला दुय्यम दर्जाचे स्थान प्राप्त झाले आहे. हे ध्येय भवसागर पार करण्याचे बाबतीत असमर्थ ठरले हे सर्वमान्य आहे. भवरोग हा जागतिक उपायांनी बरा होण्याजोगा नसल्यामुळे जागतिक ध्येय हे फक्त जगापुरतेच महत्वाचे असते. नैतिकदृष्ट्या जागतिक ध्येय सबळ असतेच असे सांगता येत नाही. मानवी जीवनाची मूल्यें, संसारीक ध्येयाचा पाठपुरावा करीत असताना दुर्लक्षिलेली दिसून येतात. कारण वैयक्तिकपणाचा साज येथे महत्वाचा मानला जातो. साहजिकच संसारीक ध्येय स्वार्थमूलक बनले जाते. येथील मानमरातब केवळ दिखावुपणाचा असतो, असा संतमंडळींचा अनुभव आहे. प्रस्तुत लेखकाचाही असाच अनुभव आहे. स्वार्थ अनर्थ ओढवित असतो.

## बाबांची दिव्य शिकवण

महापुरुष श्री साईबाबा यांनी भक्तांना पारमार्तिक दृष्टी अंगी बाळगण्याची दिव्य-शिकवण दिलेली आहे. ''जशी दृष्टी - तशी सृष्टी'' या न्यायाने बाबांची ही महान शिकवण भक्तांना थेट दिव्यत्वापर्यंत नेऊन सोडते. बाबांची उपदेशात्मक शिकवण केवळ नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ नसून भ्तांना परमेश्वरप्राप्ती करून देणारी अशी सर्वश्रेष्ठ आहे. माणूस केवळ नैतिकदृष्ट्या श्रेष्ठ असून भागत नाही तर त्याला यापुढील जो परमेश्वर-प्राप्तीचा मार्ग आहे तोही आक्रमावा लागतो. बाबांनी ही दिव्य-दृष्टी ठेवून हा सदुपदेश केलेला आहे. या महापुरुषाचे हे वैशिष्ट्य आहे. क्षणाक्षणाला शिकवते ते शिक्षण होय.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचे जीवनदृष्ट्या प्रमूखत्वे चार भाग पाडता येतात.

(१) मातेचा सेवापूर्वक सन्मान.

(२) शुद्ध व पवित्र मनाने देवाचे नामस्मरण.

(३) समाजाची प्रेमपूर्वक सेवा.

(४) स्वानंदाची अनुभूति.

भाग (१): सेवा करण्यासाठी लागणारे मातृ-सान्निध्य सर्वांनाच लाभते असे नाही. साई ही जगन्माता असल्यामुळे सर्वांनाच साई-मातेचे स्मृति-सान्निध्य सदासर्वकाळ सहजपणे लाभण्यासारखे आहे. साई-मातेची ही सर्वश्रेष्ठ कृपा आहे. भक्ताच्या कृतज्ञतेने ही साई-कृपा सदासर्वदा वर्षत रहात असते. या दृष्टीने लेखकाचा अनुभव खालील एका जुन्या काव्यात दिलेला आहे. ते अनुभवात्मक काव्य असे :

**हवा मज माझाच साईनाथ**
**नको मज अन्य की जीवनात ॥ध्रु०॥**

**मी असता बालपणात**
**चाले माझ्या पाठोपाठ।**
**मी पडता धरूनि हात**
**दिधली मजला प्रेमळ साथ ॥१॥**

**मी येता तारूण्यात**
**वाट मज दिसे न अंधारात।**
**बोल मग हळुच येति कानात**
**''चाल मज घेवुनि विश्वासात'' ॥२॥**

**ठेवुनि बोधामृत ध्यानात**
**वाट मी चाले संसारात।**
**उणे मज काही न आयुष्यात**
**भेटहि दिधली प्रत्यक्षात ॥४॥**

भगवान श्री साईबाबांची अमृतवाणी बोलते :

**''माझा जो जाहला काया, वाचा मनी।**
**तयाचा मी ऋणि। सर्वकाळ ॥**
**साई म्हणे तोचि, तोचि झाला धन्य।**
**झाला जो अनन्य। माझ्या पायीं ॥''**

बाबांची ही शिकवण अंगी बाळगण्यासाठी अंतरंगात 'श्रद्धा' आणि बाह्य प्रांगणात 'सबुरी' (धैर्य) असावी लागते. साईमातेचा सन्मान राखण्यासाठी या गोष्टी अंगिकाराव्या लागतात.



भाग (२) : देवाचे नामस्मरण : बाबांच्या सतत स्मृति-सान्निध्यात राहिल्याने नामस्मरणाला शाश्वतता प्राप्त होत असते. शाश्वत सुख हे नामस्मरणाने लाभत असते. संसारीक सुख हे अल्पजीवी असते. ज्यास सतत सुखात रहाण्याची इच्छा आहे त्याने नामस्मरणात वसावे हे चांगले. नामस्मरणाला काळवेळ, स्नान, संध्या, पूजाअर्चा वगैरे सोपस्कार लागत नाहीत. मन शुद्ध व पवित्र असले म्हणजे झाले. चोरी, लबाडी, हाव, निंदानालस्ती वगैरे गोष्टी जीवनात टाळल्याने मन शुद्ध व पवित्र राखता येणे शक्य होत असते. नामाची सोबत म्हणजे सहज लाभ देणारा सत्संग होय. सत्संगाने वृत्ती सुधारते; वासना दूर सारता येतात; क्रोध आवरता येतो; निंदा टाळता येते; मोहापासून तसेच हिंसेपासून दूर रहाता येते; सात्त्विक गुण सदा अंगी बाळगता येतो. असे अनेक लाभ सत्संगप्रेमी व्यक्तीला सहजपणे मिळत असतात. नाम हेच जीवन बनले जाते.

भाग (३) : प्रेमपूर्वक सेवा : जगामध्ये जीवन जगण्यासाठी जनसंपर्क हा साधावाच लागतो. आत्मियता व प्रेम अंगी बाळगून साईबाबांनी सेवाधर्माचे पालन कसे करावे याचे प्रात्यक्षिक साऱ्या जगासमोर करून दाखविले आहे. त्यांनी उपकारबुद्धीही मनात बाळगली नाही. आप-परभाव त्यांच्यापाशी औषधापुरताही नव्हता. सेवा आणि स्वार्थ यांचे नेहमीच वितुष्ट असते. जेथे स्वार्थ उद्भवतो तेथ सेवा संपुष्टात येते. म्हणून सेवा ही सापेक्षभावाची नसावी. मानवी जीवनात सेवाधर्माला अनन्यसाधारण महत्व आहे. सेवाधर्म आचरल्याविना जीवनाला पूर्णता येत नाही. अपूर्ण जीवनाने मनाला शांती लाभत नाही. शांतिविनाचे जीवन वाया जात असते. सेवाधर्म हा परस्परांच्या सहकार्याने राबवावा लागतो. म्हणून साईबाबा म्हणत असत की कोणाचेही श्रम फुकट घेऊ नयेत. यथाशक्ती-यथामती प्रत्येकाने एकमेकास सहाय्य हे केलेच पाहिजे. अशानेच सेवाधर्माचा सन्मान राखला जात असतो. सेवाधर्मात सहजीवनाचे तत्त्व सामावले आहे.

## ॥ स्वानंदानुभूति ॥

भाग (४) : स्वानंदानुभूति : साईबाबा हे स्वानंद-सम्राट आहेत. स्वानंदाचे आगर असलेले साईबाबा आनंदाची लयलूट नेहमीच करीत आलेले आहेत. आनंदाची देवघेव हाच साईबाबांचा उदीम हाय. भक्तांचा आनंद साईबाबांचे पोषण करीत असतो. या आनंदानेच त्यांचे अस्तित्व चिरकाल टिकून राहिले आहे.

स्वानंदाची अनुभूती घेणे हा प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिद्ध हक्कच आहेआणि तो प्रत्येकाने बजावावा हाच बाबांचा आग्रह आहे.आनंदाची अनुभूती घेतल्याविना शेवटचा श्वास माणसाने सोडू नये, इतका हा आनंद अतिशय महत्वाचा आहे. हा आनंद प्रत्येकाच्या अंतर्मनात साठविलेला आढळतो. फक्त त्याची अनुभूती प्रत्यक्षपणे कशी घ्यावी याचे प्रशिक्षण साई-सहवासाने ज्याचे त्यानेच घ्यावयाचे असते. लहान बालक सर्वस्वी मातेच्या प्रेमळ आश्रयाखाली भक्तांनी संसाराची काहीएक चिंता न करता निर्भयतेने स्वानंदाची अनुभूती घेत असावे हेच श्रेयस्कर होय. जगाच्या भूल पाडणाऱ्या प्रेयस गोष्टींकडे पाठ फिरवून जीवन आनंदाने जगावे हे जीवनविषयक सत्य होय. सत्य हे कधीच बदलणारे नसल्यामुळे शाश्वतच असते. थोडक्यात स्वानंदानुभूतीविषयी संत तुकाराम महाराज यांच्या शब्दात एवढेच म्हणता येते. ''आनंदाचे डोही आनंद तरंग। आनंदचि अंग। आनंदाचे॥'' स्वत: साईबाबा हे स्वानंद-सम्राट आहेत; भक्तांना संरक्षण देऊन आनंद देण्यासाठीच त्यांचे शाश्वत अस्तित्व या जगात आहे.

प्रारब्धाने जरी जीवन व्यतीत होत असले तरी भक्तांचे बाबांवरील प्रेम प्रबळ असले म्हणजे प्रारब्धही हतबल होत असते.

लेखकाच्या बाबांवरील श्रद्धेची अशी ठाम निष्ठा आहे. ग्रहांच्या आहारी भक्ताने न जाता बाबांना शरणागतीपूर्वक प्रार्थना करावी म्हणजे जीवनाची योग्य दिशा बाबा भक्तांस दाखवितात असा दृढ अनुभव आहे. अनुभवाच्या शब्दांत बाबांची कृपा आणि सत्य यांचा निवास असतो; म्हणून असे शब्द प्रभावी बनतात.

महापुरुषाविषयीचे आंतरिक प्रेम जेव्हा बाह्य प्रांगणात उतरते तेव्हा त्या प्रेमास वाचा फुटते ती अशी :

**क्षणाक्षणाला तुझी साईशा**
**आठवण मजला येते।**
**विरहाने मम कंठ दाटता**
**काळिज तिळतिळ तुटते ॥१॥**

**कणाकणाने देह झिजता**
**आयुहि हळुहळू सरते।**
**कशी काय ती पुढील वेळा**
**मज ना काहिच कळते ॥२॥**

**अमृतवाणी तुझी साईशा**
**कानीं या घुमघुमते।**
**नयनांची या दृष्टि साईशा**
**तुलाच शोधित फिरते ॥३॥**

**प्रेमाची तव चाल साईशा**
**पदोपदी आठवते।**
**चाहुल तुझि मज अशी लागता।**
**आसही उंचावते ॥४॥**

**संग तुझा तो गोड साईशा**
**हवाहवासा वाटे।**
**सुगंध याचा मजसी लाभता**
**हृदयही हेलावते ॥५॥**

**गोडअशी ही स्मृति साईशा**
**जागृत मज ठेविते।**
**सत्संगाची गोडी मजला**
**मार्ग तुझा दाविते ॥६॥**

**हृदय-भाषा तुझी साईशा**
**शब्दाविण बोलते।**
**उपाधीस मग वाव न मिळता**
**शांती मना लाभते ॥७॥**

**प्रपंचात अशी साथ लाभता**
**सुख चढे स्वर्गाते।**
**सत्य धर्म अन् प्रेम, शांतीला**
**मन हे कवटाळिते ॥८॥**

**आता मागणे एकचि तुजला**
**देइ मज अभयाते।**

**तुझ्याच पायीं ठेवि मना या**
**दुजे न सुख यापरते ॥९॥**

महापुरुषाचा असा सहवास लाभणे हे परमभाग्याचे द्योतक होय. पूर्वसुकृत फळाला येते ते असे. मानवाचे मार्गदर्शन करणारे साईबाबा हे सनातन सारथीहोत. देह, मन, बुद्धी म्हणजेच माणूस असे म्हणता येत नाही. देहात वसणाऱ्या आत्म्याला ओळखा म्हणजे खऱ्या 'मी'ची ओळख पटेल असा बाबांचा दिव्य संदेश आहे.

महापुरुषाच्या पवित्र चरणीं सद्भावे समर्पण.

## साईबाबाऽऽ!

*सद्‌गुरू साईबाबा ! देई मज रे दर्शन ॥धृ०॥*

*सद्‌गुरू साईबाबा*
*कई जन्म जाहले*
*आळवितो तुज रे*
*देई मज रे दर्शन*
*सद्‌गुरू साईबाबा ! देई मज रे दर्शन ॥१॥*

*तव पोथी पारायण*
*अनुभवितो नारायण*
*कथामृत तुझे पिऊन*
*जाहलो मी रे पावन*
*सद्‌गुरू साईबाबा ! देई मज रे दर्शन ॥२॥*

*व्याकुळले माझे मन*
*घ्यावया तुझे दर्शन*
*करितो तव चिंतन*
*आता तरी दे दर्शन*
*सद्‌गुरू साईबाबा ! देई मज रे दर्शन ॥३॥*

**❑ श्रीकृष्ण केसरी**

**'श्री साईलीला'च्या माहे जुलै-ऑगस्ट, ९६च्या अंकात पृष्ठ क्र. ४५ वर साईनाम जपाच्या घड्याळाची माहिती आम्ही दिली होती. ते घड्याळ शेट्रा टाइम्स (प्रा. लि.) या कंपनीने बनविलेले असून त्या घड्याळाची किंमत ४८० रुपये आहे.**

**का. सं.**

# असे भक्त, अशी भक्ती

## ५० वर्षे अखंड शिरडी वारी करणारे : प्रभाकर सावंत



१९६८च्या उत्सवात झोळी घेऊन शिरडी गावात भिक्षा मागताना
श्री. सावंत (डावीकडून ४थे) शेजारी मधोमध विख्यात संगीतकार सी. रामचंद्र (धोतर नेसलेले).

मुंबईचे प्रभाकर रामचंद्र सावंत हे ८१ वर्षांचे उत्साही साईभक्त, साईनिष्ठेचा एक आदर्श व अनुकरणीय उदाहरण आहे.आज ८१व्या वर्षीही १८ वर्षाच्या तरुणाला लाजवेल असा उत्साह व धडाडी त्यांच्या अंगी असून इ.स. १९४७ पासून आजपर्यंत गेली ४९ वर्षे ते श्री साईबाबांच्या समाधी मंदिरातील सर्वच्या सर्व प्रमुख उत्सवांमध्ये सहभागी झालेले आहे. इतक्या सातत्याने, इतक्या निष्ठेने क्वचितच कोणा भक्तास शिरडीची वारी करण्याचे महदभाग्य लाभते. श्री. प्रभाकर सावंत हे त्यापैकीच एक भाग्यवान साईभक्त आहेत.

श्री. सावंत यांचा जन्म मध्य प्रदेशातील राजनंदगाव येथे १९१६ साली झाला. वडिलांच्या नोकरीमुळे सावंत परिवार मुंबईत आला आणि इथेच स्थाईक झाला. प्रभाकर यांचे शिक्षण मुंबईतच झाले 'बर्मा शेल' या तेल कंपनीमध्ये त्यांनी नोकरी केली व सुपरिंटेंडेंट म्हणून निवृत्त झाले. पुढे त्यांनी श्री शेषराव वानखेडे यांच्याबरोबर काही वर्षे कार्य केले. आज ८१व्या वर्षीही ते एका खासगी दुकानात त्या दुकानदाराच्या प्रेमळ आग्रहास्तव नोकरी करीत आहेत. गंमत म्हणजे हा दुकानदारही साईभक्त असून दरवर्षी शिरडीची वारी करणारा आहे व शिरडीतच त्यांनी सावंत यांना साईभक्त म्हणून आपल्या दुकानी नाकरी करावी अशी इच्छा व्यक्त केली होती.

श्री. सावंत हे बर्मा शेलमध्ये असताना त्यांनी मुंबईतील बऱ्याच दुकानात-पानपट्ट्यांवर श्री साईबाबांचे फोटो पाहिले व हे कोण म्हणून त्यांनी चौकशी केली. तेव्हा मालाडला प्रभाकरमहाराजांकडे जा म्हणजे नेमकी माहिती मिळेल असे त्यांना सांगण्यात आले. श्री. सावंत मोठ्या कुतुहलाने प्रभाकरमहाराजांकडे गेले. त्यांनी श्री साईमहती सांगितली व